# देशात सन २०५०पर्यंत वृद्धांचा टक्का वाढणार

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई

तरुणांची सर्वाधिक संख्या असणारा देश अशी ओळख असलेल्या भारतात भविष्यात वयोवृद्धांचा टक्का वाढणार आहे. २०५०पर्यंत एकूण लोकसंख्येच्या २० टक्के नागरिक वयोवृद्ध असणार आहेत, अशी माहिती एका संशोधनातून समोर आली आहे.

एमसीए वांद्रे क्लबमध्ये मुंबईतील पहिले ज्येष्ठ नागरिक जीवन संमेलन पार पडले. वाधवा ग्रुप आणि प्रायमस सीनियर लिव्हिंग यांनी या संमेलनाचे आयोजन केले होते. मुंबई आणि नवी मुंबईतील सहाशेहून अधिक ज्येष्ठ नागरिक या संमेलनात सहभागी झाले होते. मुंबई महानगर प्रदेशात एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या २०३१ अखेर २.३ दशलक्ष होणार आहे. राज्याची लोकसंख्या १२.५ कोटी असून यात वयोवृद्धांचा टक्का ११.७ आहे. राष्ट्रीय स्तरावर वयोवृद्धांची सरासरी १० टक्के आहे. २०३१पर्यंत एकूण लोकसंख्येपैकी १५ टक्के लोकसंख्या ही ज्येष्ठांची असणार आहे. एमएमआरमधील ज्येष्ठ नागरिक विभक्त वातावरणात एकट्याने राहण्यास तयार आहेत, असा निष्कर्ष ऑरमॅक्स कॉम्पास फर्मने केलेल्या संशोधनातून पुढे आला आहे.

२०५० अखेर देशातील ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण २० टक्क्यांवर पोहोचणार आहे. यामुळे सव्वातीन लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांना राहण्यायोग्य जागेची गरज निर्माण होणार आहे, असे वाधवा समूहाचे अध्यक्ष विजय वाधवा यांनी सांगितले. २०११मधील जनगणनेनुसार, साठ किंवा त्याहून अधिक वय असलेल्यांची संख्या १०३ दशलक्ष होती. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण ८.६ टक्के होते. २०२१मध्ये ही संख्या १३.९ कोटींवर पोहोचली असून ती एकूण लोकसंख्येच्या दहा टक्के आहे.